तरुण भारत संवाद मंगळवार, २ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा

## महावितरणचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपारिक चौकट मोडीत निघाली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी करियर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती विषयांशी व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आवाहनांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.बी.थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांमध्ये शैक्षणिक पात्रता पूर्ण करताना त्या विषयांमध्ये पारंगत होऊन आत्मविश्वासाने पुढे राहावे. ज्यामुळे पदवीनंतर समाजामध्ये वावरताना येणाऱ्या असंख्य आवाहनांना सक्षमपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण होईल.



कोल्हापूर : जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एस. बी थोरात. सोबत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा.

कार्यक्रमासाठी एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहत्वाडे तर आभार सार्जंट सायली वाडकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ.श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलवडे, मेजर सुनिता भोसले, रजिस्टर एस.के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

02/12/2025

पुण्य नगरी
मंगळवार, २ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा : भोसले



**कोल्हापूर :** स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपरिक चौकट मोडीत निघाली आहे; मात्र विद्यार्थ्यांनी करिअर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती विविधांगी व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी, असे मत महावितरणच्या परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजित भोसले यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते.

भोसले म्हणाले, मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक व राजकीय संदर्भ लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी जाणीवा समृद्ध कराव्यात. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपले वेगळेपण जपावे. समाजाचा आरसा असणाऱ्या वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे. अध्यक्षीय मनोगतात प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. थोरात यांनी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांमध्ये शैक्षणिक पात्रता पूर्ण करताना त्या विषयांमध्ये पारंगत होऊन अग्रक्रमाने पुढे राहावे, असे सांगितले.

प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहरवाडे यांनी केले. आभार सार्जंट सायली वाडकर यांनी मानले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलवडे, मेजर सुनीता भोसले, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सिंधुदुर्ग समाचार

मंगळवार दि.२ डिसेंबर २०२५ (कोल्हापूर)

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा : विश्वजीत भोसले

कोल्हापूर/प्रतिनिधी :

स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपारिक चौकट मोडीत निघाली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी करियर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती विविधांगी व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आवाहनांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.



विश्वजीत भोसले पुढे म्हणाले, 'मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक व राजकीय संदर्भ लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी आपल्या जाणीवा समृद्ध कराव्यात. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपले वेगळेपण जपावे. आपापल्या क्षेत्रातील उच्च पदवी संपादित करावी. समाजाचा आरसा असणाऱ्या वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे.' अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस. बी.थोरात म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांमध्ये शैक्षणिक पात्रता पूर्ण करताना त्या विषयांमध्ये पारंगत होऊन अग्रक्रमाने पुढे राहावे. ज्यामुळे पदवीनंतर समाजामध्ये वावरताना येणाऱ्या असंख्य आवाहनांना सक्षमपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण होईल.'

सदर कार्यक्रमासाठी एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहरवाडे तर आभार सार्जंट सायली वाडकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभय कुमार साळुंखे, संस्था सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे, संस्था मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आयक्यूएससी प्रमुख डॉ.श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलवडे, मेजर सुनिता भोसले, रजिस्टर एस.के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

● बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५

# शेतकऱ्याची मुलगी अधिकारी बनली

सुळे : सावर्डे तर्फ असंडोली, ता.पन्हाळा येथील प्रतिक्षा पंडीत चौगले हीची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा



विभागामार्फत घेण्यात आलेल्या सरळ सेवा परीक्षेतून जलसंपदा विभाग पुणे, कालवा निरीक्षकपदी निवड झाली. प्रतिक्षा एका सामान्य कुटुंबातील मुलगी असून तिचे वडील पंडीत चौगले शेती करतात. आई संगिता चौगले गृहिणी आहे. या यशामध्ये तिला आई-वडील, चुलते दै.जनप्रवासचे कार्यकारी संपादक कृष्णात चौगले यांचे पाठबळ मिळाले. तिने प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर सावर्डे, माध्यमिक ज्ञानराज विद्यालय, उच्च माध्य.डी.सी. नरके कुडित्रे, न्यू कॉलेज येथून विज्ञान पदवी तर विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथून विज्ञान शाखेतून पदवीत्तर पदवी पूर्ण केली. त्यानंतर तिने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. धर्मराज अभ्यासिका केंद्रात सराव करत अभ्यासात सातत्य ठेऊन तिने हे यश संपादन केले. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत तिने यशाला गवसणी घातली. तिचे कौतुक होत आहे.

पुण्य नगरी

कोल्हापूर । बुधवार, ३ डिसेंबर २०२५

# क्रिकेट संघ प्रशिक्षकपदी मुजावर

**कोल्हापूर :** राष्ट्रीय खेल महासंघ पुरस्कृत १९ वर्षांखालील मुलांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा ५ ते १० डिसेंबर दरम्यान हिसार हरियाणा येथे होत आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या प्रशिक्षक पदी विवेकानंद कॉलेजचे क्रिकेट प्रशिक्षक आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे स्पर्धा कमिटीचे उपाध्यक्ष साद मुजावर यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र संघाचे सराव शिबिर दि. ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या काळात वर्धा येथे होत आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघ तुल्यबळ असून तो राष्ट्रीय स्पर्धेत अव्वल कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



कोल्हापूर, बुधवार, ३ डिसेंबर २०२५ पुढारी

# प्रशिक्षकपदी साद मुजावर यांची निवड



**कोल्हापूर :** राष्ट्रीय खेल महासंघ पुरस्कृत १९ वर्षांखालील मुलांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा दि. ५ ते १० डिसेंबर दरम्यान हिस्सार (हरियाणा) येथे आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी कोल्हापूरच्या साद मुजावर यांची निवड झाली आहे. ते विवेकानंद कॉलेज कोल्हापूरचे क्रिकेट प्रशिक्षक व कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे स्पर्धा कमिटीचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

दैनिक महासत्ता
बुधवार, ता.३ डिसेंबर २०२५
८

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा-भोसले

कोल्हापूर, ता.२ (प्रतिनिधी)-

स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपारिक चौकट मोडीत निघाली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी करियर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती विविधांगी व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आव्हानांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते. विश्वजीत भोसले पुढे म्हणाले, 'मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक व राजकीय संदर्भ लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी आपल्या जाणिवा समृद्ध कराव्यात. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपले वेगळेपण जपावे. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहरवाडे तर आभार सार्जंट सायली वाडकर यांनी मानले.

कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, संस्था मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी, मानस दीक्षित, कर्नलविक्रम नलवडे, सुनिता भोसले, रजिस्टर एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.




विश्वजीत भोसले यांचा सत्कार करताना एस.बी.थोरात व अन्य.

लोकमत
कोल्हापूर, बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५

# साद मुजावर प्रशिक्षकपदी

**कोल्हापूर** : राष्ट्रीय खेल महासंघ



पुरस्कृत १९ वर्षांखालील मुलांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी विवेकानंद कॉलेजचे प्रशिक्षक आणि कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे स्पर्धा कमिटीचे उपाध्यक्ष साद मुजावर यांची निवड झाली आहे.

हिसार हरियाणा येथे ५ ते १० डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र संघाचे सराव शिबिर दि. ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या काळात वर्धा येथे होत आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघ तुल्यबळ असून तो राष्ट्रीय स्पर्धेत अव्वल कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे.

सकाळ

कोल्हापूर, बुधवार, 3 डिसेंबर २०२५

# राज्य क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी मुजावर



साद मुजावर

कोल्हापूर : हरियाणा (हिस्सार) येथे ५ ते १० डिसेंबर दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय खेल महासंघ पुरस्कृत १९ वर्षांखालील राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघाच्या प्रशिक्षकपदी साद मुजावर यांची निवड झाली. साद विवेकानंद कॉलेजचे क्रिकेट प्रशिक्षक व जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धा समितीचे उपाध्यक्ष आहेत. महाराष्ट्र संघाचे सराव शिबिर वर्धा येथे होत आहे.

ललकार

| मंगळवार, दि. २ डिसेंबर २०२५ | पान नं. ८

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा : विश्वजीत भोसले

| ललकार वृत्त |

कोल्हापूर, दि.१ (वार्ताहर) - स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपारिक चौकट मोडीत निघाली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी करिअर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती विविधांगी व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आव्हानांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.



विश्वजीत भोसले पुढे म्हणाले, 'मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक व राजकीय संदर्भ लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी आपल्या जाणीवा समृद्ध कराव्यात. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपले वेगळेपण जपावे. आपापल्या क्षेत्रातील उच्च पदवी संपादित करावी. समाजाचा आरसा असणाऱ्या वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे.' अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.बी.बोरात म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयामध्ये शैक्षणिक पात्रता पूर्ण करताना त्या विषयांमध्ये पारंगत होऊन अग्रक्रमाने पुढे राहावे. ज्यामुळे पदवीनंतर समाजामध्ये वावरताना येणाऱ्या असंख्य आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण होईल.'

सदर कार्यक्रमासाठी एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहरवाडे तर आभार सार्जंट सावली वाडकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभय कुमार साळुंखे, संस्था सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे, संस्था मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आयक्यूएसी प्रमुख डॉ.श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलवडे, मेजर सुनिता भोसले, रजिस्टर एस.के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

epaper : www.sindhudurgsamachar.com

# सिंधुदुर्ग समाचार

ऐकत रहा FM 90.4

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

कोल्हापूर

● मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी चौकसपणे विचार करावा : विश्वजीत भोसले

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

स्पर्धात्मक युग, बदललेली शैक्षणिक अध्यापन पद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपारिक चौकट मोडीत निघाली आहे. मात्र विद्यार्थ्यांनी करियर व आयुष्यातील विविध प्रश्नांप्रती खिलाडूपणे व चौकसपणे विचार करण्याची सवय निर्माण करावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आव्हानांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमधील राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.



विश्वजीत भोसले पुढे म्हणाले, 'मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक व राजकीय संदर्भ लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी आपल्या जाणीवा समृद्ध कराव्यात. नवीन तांत्रिक कौशल्ये आत्मसात करत आपले वेगळेपण जपावे. आपापल्या क्षेत्रातील उच्च पदवी संपादित करावी. समाजाचा आरसा असणाऱ्या वृत्तपत्रांचे नियमित वाचन करावे.' अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.पी.थोरात म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांमध्ये शैक्षणिक पात्रता पूर्ण करताना त्या विषयांमध्ये पारंगत होऊन अग्रक्रमाने पुढे राहावे, ज्यामुळे पदवीनंतर समाजामध्ये वावरताना येणाऱ्या असंख्य आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण होईल.'

सदर कार्यक्रमासाठी एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोडा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्जंट नेहा मेहरवाडे तर आभार सार्जंट मायली वाडकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभय कुमार साळुंखे, संस्था सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे, संस्था मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आयक्यूएसी प्रमुख डॉ.श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलवडे, मेजर सुनिता भोसले, रजिस्टर एस.के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, ४ डिसेंबर २०२५

# कोल्हापूरचा जितेंद्र बनला आंतरराष्ट्रीय 'उत्कृष्ट शेफ'

## राष्ट्रीय ज्यूदोपटू ते जागतिक दर्जाच्या शेफपर्यंतचा संघर्षमय प्रवास

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : रांगड्या शाहूनगरीच्या लाल मातीतून घडलेला राष्ट्रीय ज्यूदोपटू ते आंतरराष्ट्रीय शेफ म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा जितेंद्र करंबे याने केमन बेटावर झालेल्या आंतरराष्ट्रीय शेफ स्पर्धेत 'उत्कृष्ट शेफ' हा बहुमान पटकावला. या स्पर्धेत जगभरातील ३०० स्पर्धक शेफ सहभागी झाले होते. कोल्हापूरच्या या पठ्ठ्याने सातासमुद्रापार चमक दाखवत भारताचा झेंडा उंचावला.

शिवाजी पेठेतील तटाकडील तालमीजवळील सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेल्या जितेंद्रचा संघर्षमय प्रवास अनेक युवकांना प्रेरणा देणारा आहे. वडील कोल्हापूर महानगरपालिका केएमटीमध्ये नोकरीला, तर आई घरगुती शिवणकाम करून संसाराचा गाडा हाकत होती. तिन्ही मुलांना उच्च शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्याचे स्वप्न



जितेंद्र करंबे

पालकांनी जिद्दीने पूर्ण केले.

मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या जितेंद्रने दहावीनंतरचे शिक्षण विवेकानंद महाविद्यालयातून झाले. महाविद्यालयात असताना एनसीसीमध्ये उत्कृष्ट छात्राचा बहुमान त्याला मिळाला. त्याने नेमबाजीचे कौशल्य सिद्ध केले. याच काळात वडिलांनी त्याला ज्यूदो खेळात पाठवले. शरीरसौष्ठव आणि ताकद वाढविणाऱ्या या खेळात त्याने राज्य व राष्ट्रीय स्तरावर मोठी कामगिरी केली. मात्र, खेळातील चढउतार, राजकारण आणि पुढील दिशा न सापडल्याने त्याच्या आयुष्याला नवीन वळण मिळाले.

> पुढील काळात माझ्या कोल्हापूरकरांना जगभरातील नवनवीन खाद्यपदार्थ चाखायला देण्याचा माझा मानस आहे. खडतर कष्टाशिवाय गोड फळ मिळत नाही. माझ्या या यशात आई-वडील आणि भावांचा मोलाचा वाटा आहे
>
> **-जितेंद्र करंबे**, आंतरराष्ट्रीय शेफ

वडिलांच्या मार्गदर्शनानुसार त्याने हॉटेल मॅनेजमेंट कोर्स करण्याचा निर्णय घेतला. पुण्यातील डॉ. डी. वाय. पाटील हॉटेल मॅनेजमेंट संस्थेत प्रवेश घेऊन त्याची नवी वाटचाल सुरू झाली. शिकत असतानाही खेळ सुटला नाही; ऑल इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत त्याने आपल्या खेळाचा ठसा उमटवला. मात्र, स्वतःचे करिअर घडविण्यासाठी शिक्षणावर लक्ष केंद्रित करून त्याने पदवी पूर्ण केली.

नोकरीच्या शोधात त्याला मिळालेले पहिले मोठे यश म्हणजे जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या कोस्टा कंपनीत शेफ म्हणून रुजू होणे. तिथून सुरू झालेली वाटचाल जगभरातील उच्च तारांकित हॉटेलांपर्यंत पोहोचली. नवनवीन खाद्यपदार्थांची निर्मिती, चवीची जादू आणि लोकांच्या मनात उतरतील असे पदार्थ बनवण्याची कला त्याने आत्मसात केली.

या सर्व अनुभवाच्या जोरावर केमन बेटावर झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने आपल्या हाताची जादू दाखवत 'उत्कृष्ट शेफ' हा मान पटकावला. सामान्य कुटुंबातून आलेल्या मुलाने आंतरराष्ट्रीय पदक जिंकल्याचा अभिमान आईच्या डोळ्यांतून अश्रू बनून वाहिला. कोल्हापूरचा पठ्ठ्या ते आंतरराष्ट्रीय शेफ हा प्रवास जितेंद्रचे मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर सिद्ध केला.

पुण्य नगरी ▪ गुरुवार, ४ डिसेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये रेशीमशास्त्रावर मार्गदर्शन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने रेशीमशास्त्रावर मार्गदर्शनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानात विद्यार्थ्यांना रेशीम उद्योगाचा इतिहास, संगोपन पद्धती, तसेच करिअरच्या विविध संधींबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. डॉ. आर. पी. कावणे यांनी व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. डॉ. कावणे यांनी रेशीम उद्योगाचा इतिहास, किड्यांचे संगोपन, प्रशिक्षणाच्या सुविधा, कौशल्य विकास, रोजगार क्षमता आणि करिअरच्या विविध संधींविषयी अत्यंत उपयुक्त माहिती दिली. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. थोरात यांनी केले. हा उपक्रम प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील शिक्षकांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडला.

हॅलो प्रभात

# राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी 'विवेकानंद'च्या अनुष्का पाटीलची निवड



कोल्हापूर : हॅलो प्रभात

इंदापूर येथे २७ ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान झालेल्या राज्यस्तरीय १७ वर्षांखालील मुलींच्या शालेय कुराश स्पर्धेत विवेकानंद कॉलेजची अनुष्का अजित पाटील (इयत्ता ११वी, विज्ञान) हिने अतिशय दमदार कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. तिच्या या उज्ज्वल कामगिरीच्या जोरावर तिची उत्तरप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली असून कोल्हापूरचा अभिमान आणखी उंचावला आहे. अनुष्काच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. तिच्या यशामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे महत्त्वपूर्ण प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात, ज्युनिअर जिमखाना प्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस.के. धनवडे व सुरेश चरापले यांचेही विशेष मार्गदर्शन तिला मिळाले. अनुष्काने राष्ट्रीय पातळीवर चमकावी, अशी अपेक्षा महाविद्यालय व संस्थेमार्फत व्यक्त करण्यात आली आहे.

epaper.helloprabhat.in
05 Dec 2025 - Page 3

दैनिक जनप्रवास

● शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५



अनुष्का पाटीलचे अभिनंदन करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे. सोबत डॉ. एस. पी. थोरात, प्रा. संतोष कुंडले आदी.

# राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी अनुष्काची महाराष्ट्र संघात निवड

जनप्रवास : कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत तथा जिल्हा क्रीडा परिषद इंदापूरातील शहा सांस्कृतिक भवनमध्ये १७ वर्षांखालील मुली या राज्यस्तर शालेय कुराश स्पर्धा झाल्या. स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींमधून इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील अनुष्का पाटीलने सुवर्ण पदक मिळविले. तिची उत्तरप्रदेशातील राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

संघातील खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. संतोष कुंडले, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रशांत कांबळे, साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी विविधांगी विचार करावा : भोसले

कोल्हापूर, ता. ४ : बदललेली शैक्षणिक अभ्यासपद्धती व गतिमान जीवन यामुळे शिक्षणाची पारंपरिक चौकट संपली आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी करिअर व आयुष्यातील विविध प्रश्नांशी चौकसपणे विचार करण्याची सवय लावून घ्यावी. यामुळे येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आव्हानांनाही सक्षमपणे सामोरे जाता येईल, असे मत महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विश्वजित भोसले यांनी आज येथे व्यक्त केले.

ताराबाई पार्क येथील विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या उभारणी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. थोरात होते. जितेंद्र भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. नेहा मेहरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. सायली वाडकर यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

शनिवार, ६ डिसेंबर २०२५

# 'खेलो इंडिया'मध्ये रिया पाटीलचे यश



कोल्हापूर : राजस्थान येथे झालेल्या ५ व्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स भाग १ मध्ये शिकणारी विद्यार्थिनी रिया पाटील हिने ८०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये कांस्यपदक मिळवले. यशस्वी खेळाडूला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

तरुण भारत संवाद

मंगळवार, ९ डिसेंबर २०२५

# डॉ. आंबेडकर यांचे देश उभारणीत महत्त्वाचे योगदान : डॉ. काळेबाग

प्रतिनिधी

कोल्हापूर

आपण सर्व एक आहोत, ही भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या मनात बिंबवली. शेतकऱ्यांसाठीचा सर्वात मोठा मोर्चा डॉ. आंबेडकर यांनी काढला. ज्या देशाची शेती व उद्योगधंदे विकसित असतात, त्याच देशाची प्रगती होते, हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी वित्त आयोग, जल आयोग, ऊर्जा आयोग स्थापन करून देशाला समृध्द करण्यावर भर दिला. शिक्षणाला विकासाचे माध्यम मानत नवभारताच्या निर्मितीची दृष्टी निर्माण केली. देश उभारणीत डॉ. आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांचे विचार विद्यार्थ्यांनी अंमलात आणून बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत घडवावा, असे प्रतिपादन भोगावती महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख, डॉ. विजय काळेबाग यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी आयोजित 'आधुनिक भारताच्या निर्मितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' यावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्युनिअर, सिनिअर कॉलेजचे स्टाफ सेक्रेटरी, एस. के. धनवडे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## विचारांचा जागर करावा

गावडे यांनी, मानवतेचे प्रतिक म्हणून डॉ. आंबेडकर यांना ओळखले जाते. समाजातील जातीयता नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. युवा पिढीने जयंती, महापरिनिर्वाण दिन या दिवशी व्यसनाधिनता टाळून या महापुरुषांच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन केले.

तरुण भारत संवाद
शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५



# विवेकानंद कॉलेजची पन्हाळा पावनखिंड मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठा साम्राज्याच्या इतिहासातील सर्वात महत्वाच्या घटनांची आठवण करून देणारी मोहीम व इतिहासाची साक्ष पाळत पन्हाळा ते पावनखिंड परिसरातील ही आव्हानात्मक आणि प्रेरणादायी पदभ्रमंती विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व एन.सी.सी. छात्रांनी यशस्वीरित्या पूर्ण केली. यावेळी शिवकाळातील पराक्रमाची साक्ष देणाऱ्या वीर शिवराय आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याची आठवण जागी केली.

या पदभ्रमंतीची सुरुवात पहाटे पन्हाळा किल्ल्यावरून झाली. जंगलातील वाटा, चढ–उतारांनी भरलेल्या डोंगर रांगा, तसेच अवघड मार्ग पार करत विद्यार्थ्यांनी व एन.सी.सी. छात्रांनी अत्यंत शिस्तबद्ध प्रवास केला. पावनखिंड येथे पोहोचताच सर्वांनी बाजीप्रभू देशपांडे व बांदल मावळे यांच्या बलिदानास अभिवादन केले.

या पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन एन.सी.सी. मुली विभागाच्या एन.सी.सी. मेजर सुनिता भोसले व आय.क्यू.ए.सी. प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांचे मार्फत करण्यात आले होते. या मोहिमेस सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. सह्याद्री प्रतिष्ठानचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती व अध्यक्ष हेमंत साळोखे, सदस्य शुभम कोळी, प्रविण केंबळे, योगेश येटोळे, पार्थ जाधव, चेतन कांबळे, राजवर्धन आडनाईक, अखिलेश कुरव यांचे सहकार्य लाभले. या पदभ्रमंतीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. पी. थोरात, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडींग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे, एस.के. धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्यनगरी

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ । कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज हे शिक्षणासह कलेचे संस्कार केंद्र

## अभिनेते आनंद काळे; ज्युनिअर सायन्स एज्युकेशन फेअरचा उद्घाटन सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद कॉलेज हे शिक्षणाबरोबरच कला व क्रीडा क्षेत्रांचे संस्कार केंद्र आहे. महाविद्यालयामध्ये नृत्य, गायन, वादन, अभिनय या सुप्त गुणांना वाव देणारे कार्यक्रम आयोजित केल्यामुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे प्रतिपादन अभिनेते आनंद काळे यांनी केले. येथील स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये ज्युनिअर सायन्स एज्युकेशन फेअरच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना अभिनेते आनंद काळे. सोबत इतर मान्यवर.

या फेअरमध्ये इयत्ता अकरावी, बारावी सायन्स या वर्गातील विविध कलाप्रकार तसेच पोस्टर प्रदर्शन, टाकाऊपासून टिकाऊ, फूड स्टॉल इत्यादीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. दीपप्रज्वलन आणि शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने प्रारंभ झाला. स्वागत व प्रास्ताविक ज्युनि. सायन्स विभागप्रमुख प्रा एम. आर. नवले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. गीतांजली साळुंखे यांनी करून दिला. आभार प्रा. एस. टी. शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. ए. पी. साळोखे, प्रा. ए. पी. म्हात्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागातील प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. एस. एस. जगताप, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. एस. ए. माने, प्रा. आर. एन. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदींचे सहकार्य लाभले.

पुण्यनगरी

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ । कोल्हापूर

# 'विवेकानंद 'तर्फे पन्हाळा-पावनखिंड मोहीम

**कोल्हापूर :** मराठा साम्राज्याच्या इतिहासाची आठवण करून देणारी आणि राज्यभर प्रसिद्ध असलेली पन्हाळा ते पावनखिंड ही आव्हानात्मक मोहीम विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व एनसीसी छात्रांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली. या पदभ्रमंतीची सुरुवात पहाटे पन्हाळा किल्ल्यावरून झाली. जंगलातील वाटा, चढ-उतारांनी भरलेली डोंगररांग, अवघड मार्ग पार करत विद्यार्थ्यांनी व एनसीसी छात्रांनी अत्यंत शिस्तबद्ध प्रवास केला. पावनखिंड येथे पोहोचताच सर्वांनी बाजीप्रभू देशपांडे व बांदल मावळे यांच्या बलिदानास अभिवादन केले. सर्वांनी त्यांच्या शौर्यगाथेला वंदन करत एक मिनिट मौन पाळले. या मोहिमेचे आयोजन एनसीसी मुली विभागाच्या मेजर सुनीता भोसले, आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी यांनी केले. ही मोहीम सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या मार्गदर्शनाने झाली. प्रतिष्ठानचे मार्गदर्शक संभाजी छत्रपती महाराज, अध्यक्ष हेमंत साळोखे, सदस्य शुभम कोळी, प्रवीण केंबळे, योगेश वेटोळे, पार्थ जाधव, केतन कांबळे, राजवर्धन आडनाईक, अखिलेश गुरव यांचे सहकार्य लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय पर्वत दिन

कोल्हापूर : विवेकानंद ज्युनिअर कॉलेज येथे 'इकोक्लब'च्या वतीने आंतरराष्ट्रीय पर्वत दिन साजरा करण्यात आला. कॉलेजमध्ये पर्वतांविषयी पोस्टर प्रदर्शन उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. ए. जे. पाटील व प्रा. एच. बी. पाटील यांनी पाणी, अन्न, जैवविविधता आणि उपजीविकेसाठी पर्वतांचे महत्त्व विद्यार्थ्यांना स्पष्ट केले. जैवविविधता, पर्यावरण संवर्धन मोहीम व शाश्वत पर्वतीय विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पर्वतीय परिसंस्था आणि लोकांचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व समाजाने द्यावयाच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. एम. आर. नवले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा.एस. टी. शिंदे, एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो प्रभात

# विवेकानंदमध्ये 'करिअर मार्गदर्शन' व्याख्यान संपन्न



कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद कॉलेज येथे रोटरॅक्ट क्लब, आय.क्यु.ए.सी. व NCC विभागाच्या संयुक्त विद्यमाने युवकांसाठी 'करिअर मार्गदर्शन' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

६ महाराष्ट्र गर्ल्स NCC, कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवड, शिस्त, नेतृत्व, देशसेवा व आत्मविश्वासाचे महत्त्व प्रभावीपणे सांगितले.म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात अध्यक्षस्थानी होते. ग्रंथालय सभागृहात झालेला हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन आय. क्यु.ए.सी. प्रमुख डॉ. श्रुती जोशी, मेजर सुनिता भोसले व संबंधित विभागांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या करण्यात आले.

epaper.helloprabhat.in
15 Dec 2025 - Page 3

पुण्यनगरी | सोमवार, १५ डिसेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये 'करिअर मार्गदर्शन'

**कोल्हापूर :** रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेज, आयक्यूएसी विभाग व कॉलेजच्या एनसीसी विभागाच्या सहकार्याने युवकांसाठी करिअर मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान पार पडले. यावेळी ६ महाराष्ट्र गर्ल्स एनसीसी कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम विवेकानंद महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी थोरात होते. कर्नल विक्रम नलवडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवड, शिस्त, नेतृत्वगुण, देशसेवा तसेच आत्मविश्वासाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत युवकांना योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले. पाहुण्यांची ओळख कॅडेट सृष्टी पाटील व छावी यादव यांनी करून दिली. आभार लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा यांनी मानले. हा कार्यक्रम आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, मेजर सुनीता भोसले, अबिद मणेर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी पार पडला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. एच. जी. पाटील, प्रा. के. जे. गुजर, क्लब मेंबर, विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनसीसी कॅडेटस, विवेकानंद ॲकॅडमीचे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

सोमवार, १५ डिसेंबर २०२५

# जलसंपदा विभागात कालवा निरीक्षकपदी सावर्डेची प्रतीक्षा चौगले

सुळे : सावर्डे तर्फ असंडोली (ता. पन्हाळा) येथील प्रतीक्षा पंडीत चौगले हिची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत घेण्यात



आलेल्या सरळ सेवा परीक्षेतून जलसंपदा विभाग पुणे, कालवा निरीक्षकपदी निवड झाली. प्रतिक्षा ही सामान्य कुटुंबातील मुलगी असून तिचे वडील शेती करतात. तिला आई संगीता चौगले, वडील पंडीत चौगले यांचे पाठबळ मिळाले. तिने विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथून विज्ञान शाखेतून पदवी पूर्ण केली. त्यानंतर तिने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. धर्मराज अभ्यासिका केंद्रात सराव करत अभ्यासात सातत्य ठेऊन तिने हे यश संपादन केले.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा
• मंगळवार
दि. १६ डिसेंबर २०२५

# हॉकी स्पर्धेत यशवंतराव चव्हाण कॉलेज प्रथम

• विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजन

जनप्रवास : कोल्हापूर

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांच्यावतीने मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत प्रथम क्रमांक इस्लामपुरातील यशवंतराव चव्हाण कॉलेज, द्वितीय क्रमांक विवेकानंद कॉलेज, तृतीय क्रमांक कोपर्डेतील स. ब. खाडे कॉलेज, चतुर्थ क्रमांक गडहिंग्लजमधील डॉ. घाळी कॉलेज स्पर्धेमधून शिवाजी विद्यापीठाचा पुरुष हॉकी संघ निवडला आहे.

आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धेमध्ये सांगली, सातारा या जिल्ह्यामधील महाविद्यालयाचे संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. मुख्य पंच म्हणून नजीर मुल्ला, सहाय्यक पंच म्हणून सागर जाधव, योगेश देशपांडे, राहुल गावडे, श्वेता पाटील हे होते. सूत्रसंचालन डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्राध्यापक समीर पठाण यांनी मानले. स्पर्धेचे संयोजन प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. सद मुजावर, एस. के. धनवडे, सुरेश चारपले यांनी केले. या स्पर्धेसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. ई. बी. आळवेकर, डॉ. सी. बी. पाटील, कोल्हापूर जिल्हा हॉकी संघटना अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, डॉ. विकास जाधव, स्पर्धा निरीक्षक डॉ. संतोष जाधव, निवड समितीचे सदस्य डॉ. रणजीत इंगवले, डॉ. एच. ए नायकवडकर उपस्थित होते.



विवेकानंद कॉलेजमध्ये पुरुष हॉकी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी पंचांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात.

पुढारी कोल्हापूर
मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिवशस्त्र शौर्य गाथा संग्रहालयास भेट

कोल्हापूर : विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या ४० विद्यार्थ्यांनी कसबा बावडा येथील छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ येथे नुकतीच अभ्यास भेट दिली. लक्ष्मी विलास पॅलेस, कसबा बावड्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वाघनख्यांची माहिती व इतर मराठा कालखंडातील शस्त्रांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. संग्रहालयामध्ये तलवारी, कुऱ्हाडी, खंजीर तसेच पितळी व काचेच्यापासून बनलेल्या शस्त्रांची माहिती घेतली. यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांनी पाहिला. या क्षेत्रभेटीमध्ये ज्युनि. आर्टस्, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. एम. पी. मनोळी सहभागी झाल्या होत्या.

तरुण भारत संवाद
मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची 'शिवशस्त्र'ला भेट



कोल्हापूर : शिवशस्त्र शौर्यगाथाला विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक वृंद.

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद ज्युनिअर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या अंतर्गत ४० विद्यार्थ्यांची कसबा बावडा येथील छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ येथे क्षेत्रभेट आयोजित केली होती. लक्ष्मी विलास पॅलेस, कसबा बावडा मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वाघनख्यांची माहिती व इतर मराठा कालखंडातील शस्त्रांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. तसेच या संग्रहालयामध्ये तलवारी, कुऱ्हाडी, खंजीर तसेच पितळी व कातडयापासून बनवलेल्या शस्त्राची माहिती घेतली.

यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांनी पाहिला. यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूरचा विकास, आधुनिक शेतीसाठी केलेले प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या सोयी याबाबत माहिती मिळाली. श्री महाराणी लक्ष्मीबाई साहेब तलाव राधानगरीची प्रतिकृती पाहिली. या क्षेत्रभेटीसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व रजिस्टार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन मिळाले. या क्षेत्र भेटी मध्ये ज्युनि. आर्टस,

हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये प्रेरणादायी व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागाच्या वतीने . तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'Data Analytics and Visualization Using Qlik Sense' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. ओंकार कोकरे उपस्थित होते. त्यांनी आधुनिक युगात डेटा ' ॲनालिटिक्सचे वाढते महत्त्व, उद्योगविश्वातील त्याचा वापर तसेच डेटा व्हिज्युलायझेशनसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साधने व तंत्रे यांची सविस्तर माहिती दिली.

विशेष म्हणजे Qlik Sense या प्रगत प्लॅटफॉर्मवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे त्यांनी संकल्पना स्पष्ट केल्याने विद्यार्थ्यांना विषय अधिक समजण्यास मदत झाली. या उपक्रमाचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागप्रमुख प्रा. पल्लवी देसाई तसेच प्रा. आर. आर. माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या व्याख्यानाला विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळाले असून डेटा ॲनालिटिक्स व व्हिज्युलायझेशन या क्षेत्रातील नव्या संधींबाबत त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली आहे.

पुढारी बुधवार, १७ डिसेंबर २०२५



कोल्हापूर : बेळगाव येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने विजेतेपद पटकावले.

# बुद्धिबळ : ऋषीकेश कबनूरकर अजिंक्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बेळगाव येथील शास्त्रीनगर, गुजरात भवन येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ८ गुणांसह पहिल्या क्रमांकाचे २१,००० रुपये आणि चषक पटकविला. व्यंकटेश खाडे -पाटील याने तिसऱ्या क्रमांकाचे १०,००० रुपये पारितोषिक मिळवले. अशुमन शेवडेने ६ गुण मिळवून ११ वयोगटात बाजी मारली.

एआइसीएफ आणि केएससीए यांच्या मार्गदर्शनाखाली बेळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने गिरिस्तुती चेकमेट स्कूल ऑफ चेसतर्फे १८ वर्षांखालील मुलांसाठी फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत देशातील २७८ खेळाडूंनी भाग घेतला. यात १०२ फिडे मानांकित खेळाडू होते.

ऋषीकेश व व्यंकटेश हे अनुज ॲकॅडमी येथे सराव करत आहेत. ऋषीकेश स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
कोल्हापूर, गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture"
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

*Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's*

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

(An Empowered Autonomous Institute)

## ADMISSION OPEN For Year-2025-26

## ADVANCED DIPLOMA IN MEDICAL LABORATORY TECHNOLOGY (ADMLT)

Maharashtra State Board of Technical Education (MSBTE) Mumbai approved full-time short-term diploma course "Advanced Diploma in Medical Laboratory Technology" (Non Grantable). Interested and eligible candidates can apply on or before **28th December, 2025 till 5.00 pm. There are various government employment opportunities for the ADMLT and MoUs with reputed pathology laboratories and hospitals.** For more details please visit Vivekanand College, Tarabai Park, Kolhapur.

- **Eligibility : Candidates with** B.P.M.T., B.Sc. M.L.T., B.Sc. Biotechnology, B.Sc. Zoology, B. Sc. Microbiology, B. Sc. Microchemistry, B. Sc. Chemistry, B. Sc. Botany, B. Sc. Analytics, B. Sc. Life Science, B. Sc. C.L.S. (Clinical Laboratory Science), B. Voc. (Medical Laboratory Technology)
- **Duration : 1.5 Year**
- **Intake Capacity : 60.**

Place : Kolhapur, Date : 15-12-2025

Sd/-
**Dr. S. P. Thorat**
I/C. Principal

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

● शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५

## डॉ. अनिता तावडे यांची चीन युनिव्हर्सिटीमध्ये संशोधनासाठी निवड



सांगरूळ : येथील डॉ. अनिता कुंडलिक तावडे यांची चीनमधील मेनलँड फुझो नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये पोस्टडॉक्टोरल संशोधनासाठी निवड झाली आहे. डॉ. अनिता तावडे यांनी आपल्या कठोर परिश्रम आणि संशोधनातील उत्कृष्ट कामगिरीमुळे ही नामांकित आंतरराष्ट्रीय संधी मिळवली आहे. चीनच्या प्रतिष्ठित विद्यापीठात पोस्टडॉक्टोरल फेलोशिप मिळणे ही कोल्हापूर जिल्ह्यातील संशोधकांसाठी मोठी संधी मानली जात आहे. यामुळे स्थानिक स्तरावर शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात नवी प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. डॉ. तावडे यांच्या या यशाबद्दल सांगरूळ आणि परिसरातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे. हा सन्मान केवळ त्यांचा वैयक्तिक नाही, तर ग्रामीण भागातील मुलींना संशोधनाकडे वळण्यासाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत व्यक्त होत आहे.

पुण्य नगरी

SMART कोल्हापूर | ▪ शनिवार, २० डिसेंबर २०२५

## In Short

### डॉ. अनिता तावडे यांची संशोधनासाठी निवड



सांगरूळ :येथील डॉ. अनिता कुंडलिक तावडे यांची चीनमधील मेनलँड फुझो नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये पोस्टडॉक्टोरल संशोधनासाठी निवड झाली. डॉ. तावडे यांनी कठोर परिश्रम आणि संशोधनातील उत्कृष्ट कामगिरीमुळे ही आंतरराष्ट्रीय संधी मिळवली आहे. चीनच्या प्रतिष्ठित विद्यापीठात पोस्टडॉक्टोरल फेलोशिप मिळणे ही जिल्ह्यातील संशोधकांसाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे. यामुळे स्थानिक स्तरावर शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात नवी प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांचा हा सन्मान त्यांचा वैयक्तिक नाही, तर ग्रामीण मुलींना उच्च शिक्षण आणि संशोधनाकडे वळण्यासाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत व्यक्त होत आहे. या निवडीबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे तसेच विवेकानंद कॉलेजचे प्रभारी प्राचार्य एस. पी. थोरात यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी रेडिओ क्षेत्रात करिअर करावे : आपटे

कोल्हापूर : विद्यार्थ्यांना रेडिओ क्षेत्रात करिअरसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. ए.एम.एफ.एम. चॅनेल, ऑल इंडिया रेडिओ, जाहिरात एजन्सी अशा विविध क्षेत्रात नोकऱ्या वाट पाहत आहेत. उत्तम रेडिओ जॉकी होणेसाठी विविध विषयांचा व्यासंग, चौफेर वाचन, भाषा व साहित्य, सांस्कृतिक या गोष्टींची जाण असणे आवश्यक आहे, असे मत रेडिओ जॉकी मनीष आपटे यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, स्वरुपानुसार उत्तम संहिता लेखन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. सर्व क्षेत्रांची माहिती असलेला विद्यार्थी उत्तम आर.जे. म्हणून करीअर करु शकतो. ज्या विद्यार्थ्यांना छान लिहिता वाचता येते त्यांना आर.जे. होण्याची संधी आहे.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरच्या ज्युनियर आर्टस विभागाच्या वतीने नोकरी व करीअरच्या संधी या उपक्रमा अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालयातील हॉलमध्ये केले होते. याप्रसंगी ते बोलत होते. स्वागत विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. प्रा.नयना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. ढगे यांनी आभार मानले.

तरुण भारत संवाद

मंगळवार, २




# कोल्हापूरची सई लष्करात अधिकारी

## इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट

## लष्करी सेवेच्या इतिहासात कोल्हापूरचे नाव उज्वल

**तिने जिद्द ठेवली होती आपणही लष्कर सेवेतून देश सेवा करायची. त्यासाठी खडतर परिश्रम करावे लागतात याची तिला जाणीव होती. त्यामुळेच ती एका वेगळ्या ध्येयाने झपाटलेली होती आणि तिने ते सत्यात उतरवले. इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट होण्याचा मान जयसिंगपूर येथील सई जाधव हिने मिळवला आणि लष्करी सेवेच्या इतिहासात कोल्हापूरचे नाव आणखी एका सुवर्ण अक्षराने कोरले. सईने मिळवलेले हे यश तमाम कोल्हापूरकर वासियांना अभिमानाचे आहेच, याशिवाय नव्या पिढीला तिची जिद्द आणि त्यामागचे कष्ट एक नवी प्रेरणा देणारी आहे.**

▶संजय खूळ, इचलकरंजी

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुका जसा कृषीप्रधान तालुका म्हणून ओळखला जातो तसेच देशसेवेची परंपरा असलेला तालुका म्हणून शिरोळची ओळख आहे. शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी हे गाव देशसेवेसाठी देशभर परिचित आहे. याच तालुक्यातील सई जाधव मूळची जयसिंगपूरची. येथील १५व्या गल्लीत तिचे निवासस्थान आहे. सईच्या कुटुंबात लष्करी सेवेचा मोठा वारसा आहे. तिचे पणजोबा सुभेदार शंकरराव जाधव बहाद्दूर ओबीआय ऑर्डर, ब्रिटिश लष्करात होते. मामा अनिल घाटगे भारतीय हवाई दलात 'फायटर पायलट' होते. वडील मेजर संदीप जाधवही सध्या भारतीय लष्करात कार्यरत आहेत. त्यामुळे सईलाही लष्करी सेवेचे आणि देश सेवेचे अत्यंत आवड निर्माण झाली. आवड असून चालणार नाही तर त्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागणार, ही तिची जिद्द आणि मानसिकता पहिल्यापासूनच होती.

सईचे प्राथमिक शिक्षण जयसिंगपूर येथे मराठी माध्यमाच्या शाळेमधूनच झाले. त्यानंतर वडिलांची बदली झाल्यामुळे तिला बारावीपर्यंतचे शिक्षण वेगवेगळ्या ठिकाणी घ्यावे लागले. कोईमतूरमधील एयर फोर्स स्कूलमधून ती दहावी उत्तीर्ण झाली. बेळगावच्या जैन पी. यु. कॉलेजमधून बारावी झाल्यानंतर कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयातून तिने पदार्थ विज्ञान विषयातून बीएस्सी पदवी मिळवली. 'सिंबॉयसिस'मधून दूरस्थ विद्यार्थिनी म्हणून एमबीएचे शिक्षण घेत असताना ती स्पर्धा परीक्षेची तयार करत होती. याच दरम्यान केवळ पुरुषांना प्रशिक्षण देणाऱ्या इंडियन मिलिटरी ॲकॅडमीने महिलांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

डेहराडून येथील इंडियन मिलिटरी ॲकॅडमीला ९३ वर्षांचा इतिहास आहे.

### नियोजनबद्ध अभ्यास

सईने बारावीनंतर भारतीय लष्करी सेवेत जाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिने नियोजनबद्ध अभ्यास केला. आज मोबाईलचा वापर युवा पिढी वेगवेगळ्या कारणासाठी करते, परंतु सईने याचा उपयोग विविध माहिती शोधण्यासाठी तसेच अभ्यासासाठी केला. सुरुवातीच्या काळात कोणतीही कोचिंग क्लास न लावता त्यांनी अनेक व्हिडिओ पाहून तसेच पुस्तकांचा वापर करून स्वतःचे नोट्स तयार केले. सर्व्हिस सिलेक्शन बोर्डमध्ये निवड झाल्यानंतर मुलाखतीसाठी कठोर परीक्षा द्यावी लागते, याची जाणीव ठेवून तिने कोचिंग क्लास पूर्ण केले. तब्बल पाच दिवस चालणारी ही मुलाखत सईने अत्यंत आत्मविश्वासाने दिली आणि या आत्मविश्वासातूनच त्यांनी आपल्या ध्येयाला यश मिळवून दिले.





## लष्करात अनेक संधी

कोणत्याही शाखेचा अभ्यास केल्या तरीही लष्करात अनेक संधी आहेत या संधीचा अभ्यास करून युवक युवतींनी ध्येय गाठावे, असे आवाहन सईने केले. भरतीतून जवान होणे यापलीकडेही अनेक अधिकाऱ्यांच्या जागा आपल्याला काबीज करता येतात. कोणतीही पदवी परीक्षा झाल्यानंतर एनडीए मध्ये जाता येते. त्याचबरोबर कम्बाईन डिफेन्स सर्विस या परीक्षेच्या माध्यमातून शॉर्ट सर्विसमध्ये सैन्य दलात भरती होता येते. एनसीसीचे सी सर्टिफिकेट असलेल्या कँडिडेटना कोणतीही लेखी परीक्षा न देता सर्विस सिलेक्शन बोर्डच्या माध्यमातून डायरेक्ट मुलाखतीद्वारे अनेक संधी असतात. कोणतीही अभियांत्रिकी पदवी घेतलेल्याना टेक्निकल ग्रॅज्युएशन कमिशन या माध्यमातूनही अधिकारी तसेच वेगवेगळ्या पदावर नियुक्त होता येते. जेएजी (जज अडवोकेट जनरल) या परीक्षेच्या माध्यमातून लीगल सेल असलेल्या विभागातही भरती होता येते. पोस्ट ग्रॅज्युएट असलेल्या उमेदवारांना आर्मी एज्युकेशन कोअर या ठिकाणी प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्त होता येते. सैन्य दलातील एकत्रित माहिती *joinindianarmy.gov.in* या वेबसाईटवर मिळू शकते, याचबरोबर हवाई दलात पायलट व्यतिरिक्त अनेक ग्राउंड ऑफिसर साठी वेगवेगळ्या संधी असतात ***AFCAT*** परीक्षेच्या माध्यमातून आपण अधिकारी होऊ शकतो, असेही तिने यावेळी सांगितले.

देहराडून हे भारतीय लष्करासाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे, जिथे इंडियन मिलिटरी अकादमी *(IMA)* सारख्या प्रतिष्ठित संस्था आहेत, ज्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देतात. भारतीय सैन्यातील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण देणारी प्रमुख संस्था, जी तिच्या भव्य कॅम्पस आणि प्रशिक्षण सुविधांसाठी ओळखली जाते.

स्थापनेपासून आजवर ६७ हजारांहून अधिक लष्करी अधिकारी करण्याचा मान या अँकॅडमीला आहे. आज अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. त्यामुळेच इंडियन मिलिटरी अँकॅडमीने यंदा महिलांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या तुकडीत निवड चाचणी साठी सईने प्रवेश घेतला. या परीक्षा सर्विस सिलेक्शन बोर्ड या मार्फत होतात त्यासाठी देशभरातून हजारो मुली आल्या होत्या. लेखी आणि मुलाखतीतून ३० मुलींची निवड झाली. त्यातून भोपाळ येथे 'सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड'च्या मुलाखतीतून तीन मुलींची निवड झाली. वैद्यकीय चाचणी आणि लेखी परीक्षेतून तिघींतून सईची निवड करण्यात आली. मुलींच्या जागेसाठी केवळ एक रिक्त जागा होती. त्यातही तिची निवड झाल्यानंतर सोळा मुलांसमवेत तिने सहा महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणसाठी ती तयार झाली. सहा महिन्यांचे प्रशिक्षण घेणारी ती ॲकॅडमीतील पहिली महिला होती.

प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रचंड कष्ट करावे लागणार होते आणि त्यासाठी साहस ही खूप महत्त्वाचे होते याची जाणीव तिला होती. कारण हे प्रशिक्षण घेताना अनेक कठोर चाचण्यांना सामोरे जावे लागणार होते. प्रशिक्षण घेताना पाठीवर वीस किलोची बॅग हातामध्ये सुमारे चार किलो वजनाची रायफल घेऊन ३० किलोमीटर अंतर धावत पूर्ण करावे लागत होते. हे सर्व तिला निर्धारित वेळेत पूर्ण करावे लागणार होते. यासह अन्य खडतर परिश्रमानंतरच तिचे लेफ्टनंट पदाचे स्वप्न पूर्ण होणार होते. आणि हे सर्व तिने जिद्दीने पूर्ण केले आणि इंडियन मिलिटरी अँकॅडमी आयएमए मधून पहिली महिला लेफ्टनंट पदी रुजू होण्याचा मान तिने मिळवला आहे.

१३ डिसेंबर २०२५ रोजी टेरिटोरियल आर्मीमध्ये लेफ्टनंट पदावर तिची नियुक्ती झाली आहे. इंडियन मिलिटरी ॲकॅडमीच्या इतिहासात पहिली महिला लेफ्टनंट होण्याचा मान मिळवीत तिने कोल्हापूरचे नाव उंचावले आहे.

| Sr. No. | Day & Date | Time | Course Code | Course Name |
| --- | --- | --- | --- | --- |

B. Voc. (Animation & film making) - I (Sem - II) - NEP-1.0

Hellow Prabhat 24/12/2025

# “उत्कृष्टतेचा ध्यास क्षमतांना संधी देतो” — लेफ्टनंट सई जाधव



## विवेकानंद महाविद्यालयात लेफ्टनंट सई जाधव यांचा गौरवपूर्ण सत्कार

कोल्हापूर, दि. २४ (प्रतिनिधी): पांडुरंग फिरिंगे

विद्यार्थीदशेतील अभ्यासक्रमासोबत विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा मिळते आणि त्यातून करिअरसाठी संधींचे नवे दरवाजे खुलतात. मिळालेल्या संधींचे योग्य व्यवस्थापन करून बौद्धिक, भावनिक व मानसिक विकास साधता येतो. देशसेवा व समाजसेवेसाठी भारतीय सैन्यदल हे सर्वोत्तम व्यासपीठ असून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), सीडीएस, टेक्निकल एन्ट्री स्कीम, जज ॲडव्होकेट जनरल (JAG) आदी मार्गांतून कमिशन्ड ऑफिसर होता येते, असे प्रेरणादायी मत लेफ्टनंट सई जाधव यांनी व्यक्त केले.

त्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित विवेकानंद कॉलेज येथे आयोजित सत्कार समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. लेफ्टनंट सई जाधव या सत्कारमूर्ती महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले की, विद्यार्थीदशेतील हरहुन्नरीपणाला धैर्य व संयमाची जोड दिल्यास उर्जेला सकारात्मक दिशा देता येते आणि अंतर्सिद्धी साधता येते. परमपूज्य बापूजींच्या विचारांनी प्रेरित विवेकानंद शिक्षण संस्था व विवेकानंद कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे सर्वोत्तम व्यासपीठ आहे, यातूनच विद्यार्थ्यांनी उज्ज्वल करिअर घडवावे, असे त्यांनी आवाहन केले.

प्रास्ताविकात प्र. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी विवेकानंद शिक्षण केंद्र समाजाला ध्येयदृष्टी असलेले, मूल्याधिष्ठित विद्यार्थी घडवत असल्याचे स्पष्ट केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत परीक्षा विभागप्रमुख डॉ. जी. जे. नवाथे यांनी केले. लेफ्टनंट जितेंद्र भरगोंडा यांनी आभार मानले.

हा कार्यक्रम डॉ. श्रुती जोशी (आय.क्यू.ए.सी. प्रमुख), मेजर सुनिता भोसले, प्रबंधक श्री सचिन धनवडे यांच्या नियोजनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. सूत्रसंचलन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले.

या प्रेरणादायी कार्यक्रमास प्रा. गीतांजली साळुंखे, प्राध्यापकवर्ग, मेजर संदीप जाधव परिवार, एन.सी.सी. कॅडेट्स, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेची भावना आणि करिअरविषयक नवी प्रेरणा निर्माण झाली

Hello Prabhat 24/12/2025

# विवेकानंद महाविद्यालयात 'किसान दिन' उत्साहात साजरा



**विद्यार्थी-शेतकरी थेट संवादातून देशी वाणांची जनजागृती**

प्रतिनिधी : पांडुरंग फिरिंगे

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकरी वर्गाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा 'किसान दिन' कळंबा येथील शेतामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत आधुनिक व पारंपरिक शेतीविषयक माहितीची देवाणघेवाण केली.

माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी हितासाठी घेतलेले निर्णय आजही प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजऱ्या होणाऱ्या किसान दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने हा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविला.

यावेळी बी.एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी कळंबा परिसरातील शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. हवामान बदलाचे परिणाम, वाढता उत्पादन खर्च, कीड-रोग नियंत्रण, पाण्याची उपलब्धता तसेच बाजारपेठेतील अडचणी यावर सखोल चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी देशी वाणांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन, कमी खर्चात शाश्वत उत्पादन, तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धती याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

देशी बियाण्यांच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी होतो, जमिनीची सुपीकता टिकून राहते व आरोग्यदृष्ट्या सुरक्षित अन्ननिर्मिती शक्य होते, याबाबत शेतकरी व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. या संवादातून दोन्ही घटकांना अनुभवसंपन्न ज्ञानाची देवाणघेवाण झाली.

हा उपक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात व वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भाऊराव दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. अभिजीत कासारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच समाजाशी नाते दृढ करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयक जाणिवा निर्माण करणारा ठरला. भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून शेतकरी व शिक्षणसंस्था यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

Bhorat 24-12-2025

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे किसान दिन साजरा

कोल्हापूर : माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने किसान दिन कळंबा येथील शेतामध्ये साजरा करण्यात आला. उपक्रमातून विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी भेट संवाद साधत आधुनिक, पारंपरिक शेतीविषयक माहिती दिली. कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभागातील बी. एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी कळंबा परिसरातील शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतीतील विविध अडचणी, हवामान बदलाचा परिणाम, उत्पादन खर्च, कीड व रोग व्यवस्थापन, तसेच बाजारपेठेतील समस्यांबाबत माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशी वाणांचे महत्त्व, त्यांचे संवर्धन, कमी खर्चात अधिक उत्पादन, तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धती याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात तसेच वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भाऊराव दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी परिश्रम घेतले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २७ डिसेंबर २०२५

# आंतरराष्ट्रीय रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेशचे यश

कोल्हापूर : सोलापूर येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग रावसोनी चषक बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकर याने ९ फेऱ्यांत ८ गुण मिळवून संयुक्त दुसरा क्रमांक पटकाविला. यामुळे त्याला १५ हजार रुपये व चषक बक्षीस आणि फिडे रॅपिड रेटिंगमध्ये ४७ गुणांनी वाढ झाली. स्पर्धेत आय. एम. संजीत पाल (पश्चिम बंगाल) हा साडेआठ गुणांसह विजेता ठरला. त्याला ३१ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. दोन लाख रुपयांच्या बक्षिसांच्या स्पर्धेत देशातील १ आय. एम., ९४ फिडे मानांकितांसह २१२ खेळाडू सहभागी झाले होते. ऋषिकेश अनुज अकॅडमीत सराव करत असून स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



गगनतारा

# विवेकानंद कॉलेज येथे १२ वी इंग्लिश विषयावर प्रा. बुराण यांचे मार्गदर्शन

गगनतारा वृत्तसेवा

**पडळ/प्रतिनिधी, ता. २६ :** इंग्रजी विषयाचा अभ्यास योग्य पद्धतीने, सातत्याने व तज्ज्ञ मार्गदर्शनाच्या साहाय्याने केल्यास विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेत निश्चितच भरघोस यश मिळवता येते, असे प्रतिपादन प्राध्यापक नंदकुमार बुरान यांनी केले.

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित बारावी स्कॉलर बॅचच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी, परीक्षेची भीती दूर व्हावी आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्राध्यापक बुरान यांनी यावेळी बारावी इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे संपूर्ण स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रश्नपत्रिका सोडवताना वेळेचे योग्य नियोजन कसे करावे, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, तसेच उत्तरपत्रिका नीटस, शुद्ध व मुद्देसूद कशी लिहावी यावर त्यांनी विशेष भर दिला.

तसेच, प्रश्नांची अचूक मांडणी, सारांश लेखनाचे तंत्र, माइंड मॅपिंगचा प्रभावी वापर, कवितेचे रसग्रहण कसे करावे, तसेच लेखन कौशल्य कसे विकसित करावे याबाबत त्यांनी उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय बारावीच्या अभ्यासक्रमातील कादंबरीच्या आधी भागाचे सखोल व मुद्देसूद विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे निरसन करण्यात आले.

या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबाबतची भीती दूर होऊन अभ्यासाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा निश्चितच परीक्षेत फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. सुनील जगताप, साळुंखे सर, नवले सर, सौ. पाटील मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने करण्यात आले.

Main Edition
Dec 27, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com

दैनिक
महासत्ता
बुधवार, ता. ३१ डिसेंबर २०२५

# मतदान जनजागृती अभियानांतर्गत महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम

कोल्हापूर, ता.३० (प्रतिनिधी)-

कोल्हापूर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहरातील विविध महाविद्यालयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पथनाट्य, प्रभात फेरी, मतदान शपथ, पत्रलेखन, निबंध व रांगोळी स्पर्धा, दौड आदी विविध उपक्रमांचे आयोजिले होते.



मतदान जनजागृती अभियानांतर्गत महाविद्यालयांमध्ये शपथ घेताना विद्यार्थी-विद्यार्थिनी.

या अभियानांतर्गत कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसरातील विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून मतदानाची तारीख, नागरिकांनी उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडावे, कोणत्याही आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला मतदान करावे, अशा महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पथनाट्यात ३० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या विद्यार्थिनींना प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. श्रीमती पी. एम. पाटील यांचे मार्गदर्शन तर प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे प्रोत्साहन मिळाले.

महावीर महाविद्यालय, शाहू कॉलेज व शहाजी लॉ कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. तसेच नाईट कॉलेज, डी. आर. के. कॉमर्स कॉलेज, विवेकानंद कॉलेज येथे विद्यार्थ्यांकडून मतदान विषयक शपथ घेण्यात आली. मतदान जनजागृती अभियान महानगरपालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रशासक के.मंजूलक्ष्मी, उपआयुक्त किरण कुमार धनवाडे तसेच प्राचार्य बाबासो उलपे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सकाळ TODAY
कोल्हापूर, बुधवार, ३१ डिसेंबर २०२५



निमित्त शहरातील महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले.

# शहरातील महाविद्यालयांत मतदान जनजागृती

कोल्हापूर, ता. ३० : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी शहरातील विविध महाविद्यालयांत उपक्रम राबवण्यात आले. त्यात पथनाट्य, प्रभात फेरी, मतदान शपथ, पत्रलेखन, निबंध, रांगोळी स्पर्धा, दौड आदींचा समावेश आहे.

कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसरातील विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले. मतदानासाठी बाहेर पडावे, आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला मतदान करावे, अशा विषयांवर जनजागृती केली. पथनाट्यात अनन्या जाधव, तेजल गावडे, भक्ती उलपे, प्राजक्ता साळुंखे, दुर्गा घोरपडे यांच्यासह ३० विद्यार्थिनी सहभागी होत्या. प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. पी. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रोत्साहन दिले. महावीर महाविद्यालय, शाहू कॉलेज व शहाजी कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅलीचे आयोजन केले. नाईट कॉलेज, कॉमर्स कॉलेज, विवेकानंद कॉलेज, शहाजी कॉलेज व शाहू कॉलेज येथील विद्यार्थ्यांकडून मतदान विषयक शपथ घेण्यात आली. प्रशासक के. मंजुलक्ष्मी, उपायुक्त किरणकुमार धनवडे, प्राचार्य बाबासो उलपे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवले.